आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१५ ऑक्टोबर २०२५ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- नक्षलवाद्यांच्या पॉलिट ब्युरोचा महत्त्वाचा सदस्य मल्लोजुला वेणुगोपाल उर्फ भूपती याच्यासह ६१ नक्षली अतिरेक्यांचं गडचिरोली इथं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आत्मसमर्पण

- सरकारने नक्षलवादाविरुद्ध उभारलेला लढा निर्णायक पद्धतीने समाप्तीकडे चालला असल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन

- मतदारयादीतल्या त्रुटी दूर होईपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलाव्यात अशी विरोधी पक्षांची निवडणूक आयोगाकडे
मागणी

- माजी राष्ट्रपती दिवंगत डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त राज्यात वाचन प्रेरणा दिन साजरा

**आणि**

- गोव्याचे माजी मुख्यमंत्री रवी नाईक यांचं निधन

**<><><><><>**

नक्षलवाद्यांच्या पॉलिट ब्युरोचा महत्त्वाचा सदस्य मल्लोजुला वेणुगोपाल उर्फ भूपती याच्यासह ६१ नक्षली अतिरेक्यांनी आज गडचिरोली इथं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत रीतसर आत्मसमर्पण केलं. २०१४ पासून राज्यात आपल्या सरकारने नक्षलवादाविरुद्ध उभारलेला लढा आज निर्णायक पद्धतीने समाप्तीकडे चालला आहे, असंही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

**होल्ड...बाईट - मुख्यमंत्री**

ऐकूया या विषयी अधिक माहिती आमच्या गडचिरोली वार्ताहराकडून…

**... व्हॉईस कास्ट- निमगडे पीटीसी**

या आत्मसमर्पणावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नक्षलवाद्यांना संविधानाची प्रत भेट देण्यात आली. तसंच, फेब्रुवारी महिन्यात आत्मसमर्पण केलेल्या दोन नक्षलवाद्यांना पुनर्वसनासाठी प्रातिनिधिक स्वरुपात प्रत्येकी अडीच लाख रुपयांचे धनादेश मुख्यमंत्र्यांच्या हस्ते देण्यात आले.

**<><><><><>**

छत्तीसगडमधे सुकमा इथं ५० लाखांचं बक्षीस लागलेल्या २७ नक्षल्यांनी आत्मसमर्पण केलं. त्यात पीएलजीए बटालियन क्रमांक १ मधे सक्रीय २ कट्टर माओवाद्याचा समावेश असल्याचं सुकमाच्या पोलीस अधीक्षकांनी सांगितलं.

**<><><><><>**

मतदारयादीतल्या त्रुटी दूर होईपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलाव्यात अशी मागणी महाविकास आघाडी आणि काही पक्षांनी निवडणूक आयोगाकडे केली आहे. विविध विरोधी पक्षांच्या प्रतिनिधीमंडळाची आज मुंबईत निवडणूक आयोगाबरोबर चर्चा झाली, त्यानंतर विरोधी पक्षाच्या नेत्यांनी वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या विधानसभा मतदारसंघाच्या यादीतल्या त्रुटी दूर कराव्या, VVPAT चा वापर करावा, आदी मागण्या विरोधी पक्षांनी निवडणूक आयोगाकडे केल्या आहेत. यावर या मागण्यांचा सकारात्मक विचार करू, असं आश्वासन निवडणूक आयोगानं दिल्याचं माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सांगितलं. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत व्हीव्हीपॅटचा वापर करण्यात येणार नाही, मतदानाचे सीटीटीव्ही फूटेज दाखवले जात नाहीत, मतदार याद्या विरोधी पक्षांना दाखवल्या जात नाहीत. त्यामुळे निवडणूक आयोग हा कठपुतळी म्हणून काम करत असून हा आयोगाचा भ्रष्टाचार असल्याची टीका उद्धव ठाकरे यांनी केली.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी मतदार यादीतल्या काही त्रुटी माध्यमांसमोर दाखवल्या. एकाच घरामधे हजारो मतदार असणं, अनेक घरांना क्रमांक नसणं, एकाच मतदाराचं नाव अनेक ठिकाणी असणं, वयाच्या नोंदीत घोळ अशी उदाहरणं पाटील यांनी माध्यमासमोर वाचून दाखवली. निवडणूक आयोगाचं संकेतस्थळ दुसरंच कुणीतरी हाताळत असल्याचा आरोप पाटील यांनी यावेळी केला.

निवडणूक आयोगाच्या उत्तरानं आपलं समाधान झालं नसून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीला सामोरं जाणं योग्य नाही असं काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात म्हणाले. निकोप निवडणूक लोकांचा अधिकार असून त्यात हस्तक्षेप योग्य नाही असंही ते म्हणाले.

राज्य निवडणूक आयोग आणि केंद्रीय निवडणूक आयोग टोलवाटोलवी करत असल्याची टीका मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केली.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत पाटील, काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार, शेकापचे नेते जयंत पाटील, माकपचे नेते अजित नवले, भाकपचे सुभाष लांडे उपस्थित होते.

दरम्यान, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या विधानसभा मतदारसंघांच्या यादीत नव्यानं नावं समाविष्ट करणं, अथवा वगळणं किंवा अन्य बदल करण्याचा विषय राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यकक्षेत येत नसल्याचं महाराष्ट्र राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी काल स्पष्ट केलं.

**<><><><><>**

भारतरत्न आणि माजी राष्ट्रपती डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्यांना आदरांजली वाहिली आहे.

डॉ कलाम हे द्रष्टे वैज्ञानिक, प्रेरणादायी नेते आणि देशभक्त होते. त्यांनी संरक्षण आणि विज्ञान क्षेत्रात, तसंच युवक सक्षमीकरणासाठी अथक प्रयत्न केले आणि देशाला आत्मनिर्भरतेच्या मार्गावर आणलं असं उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

डॉ कलाम यांच्या स्वप्नातल्या बलशाली, आत्मनिर्भर आणि दयाशील भारताच्या निर्मितीसाठी आम्ही प्रयत्नशील राहू ,असं प्रधानमंत्री मोदी यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

डॉ. कलाम यांचा जन्मदिवस 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. यानिमित्त **मुंबई**त राजभवनातल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी मराठी पुस्तकांमधले लेख वाचले, तसंच काव्य वाचन सादर केलं . मंत्रालयात अनेक सरकारी अधिकाऱ्यांनी डॉ कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार व फुले अर्पण करून अभिवादन केलं.

**परभणी** जिल्ह्यात कातनेश्वरच्या जिल्हा परिषद शाळेत "वाचन स्पर्धा" घेण्यात आली. सर्वात जास्त पुस्तकं वाचणाऱ्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक साहित्य देऊन गौरव करण्यात आला.

**सांगली** जिल्ह्यात "ऐतिहासिक संदर्भ मूल्य असलेल्या ग्रंथांचं प्रदर्शन" आयोजित करण्यात आलं आहे . तसंच वाचन प्रेरणा दिनानिमित्त सलग 12 तास वाचनाचा उपक्रम राबवण्यात येत आहे.

**रत्नागिरी**चे जिल्हाधिकारी मनुज जिंदल आणि इतर वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांनी डॉ कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

**<><><><><>**

सप्टेंबर २०२५ या महिन्यात चारचाकी गाड्यांच्या विक्रीत ४ टक्के वाढ झाली आहे. दुचाकींची विक्री ७ टक्के वाढली असल्याचं सोसायटी ऑफ इंडीयन ऑटोमोबाईल मॅन्युफॅक्चरर्स या वाहनउत्पादक संघटनेच्या अहवालात म्हटलं आहे.

या महिन्यात ३ लाख ७२ हजार ४५८ चारचाकी गाड्या विकल्या गेल्या तर २१ लाख ६० हजार ८८९ दुचाकी वाहनं विकली गेली.

**<><><><><>**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मुंबईतून विमानाने सोलापूरमध्ये स्वतः प्रवास करून या विमानसेवेचा प्रारंभ केला. आजपासून सोलापूर ते मुंबई आणि सोलापूर ते गोवा ही विमानसेवा आता सातत्याने सुरु राहणार असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

**<><><><><>**

गोव्याचे माजी मुख्यमंत्री आणि कृषिमंत्री  रवी नाईक यांचं आज पहाटे गोव्यात फोंडा इथे हृदयविकाराने निधन झालं. ते ७९ वर्षांचे होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. गोवा राज्य सरकारने तीन दिवसांचा शासकीय दुखवटा जाहीर केला आहे.

रवी नाईक यांनी १९९१ मध्ये पहिल्यांदा गोव्याच्या  मुख्यमंत्रिपदाची सूत्रे हाती घेतली. त्यांनी सुमारे २८ महिने हे पद सांभाळले. त्यानंतर पुन्हा एकदा १९९४ मध्येही ते मुख्यमंत्री झाले होते.

२०२२ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी पोंडा मतदारसंघातून भाजपच्या तिकिटावर निवडणूक लढवली आणि भाजपसाठी हा मतदारसंघ पहिल्यांदा जिंकून दिला. त्यानंतर ते सावंत यांच्या नेतृत्वाखालील भाजप सरकारमध्ये कॅबिनेट मंत्री होते.

**//<><><><><>//**